महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com | www.facebook.com/maharashtra.c.times | Info@maharashtracrimetimes.com | Twitter- @MHCrimeTimes | Whatsapp -9803386748

मूल्य २/- रुपये

● वर्ष : १२ ● अंक: ०८ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार २५ मे २०२१ ते सोमवार ३१ मे २०२१ ● RNI. REG. NO. 105858/2010 ● POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022



## महाराष्ट्र चार टप्प्यात अनलॉक होणार?

**मुंबई (योगेश होळंब): गेल्या काही दिवसांपासून राज्यातील कोरोना रुग्णांची संख्या कमी होत आहे. एप्रिल महिन्यात राज्यात दररोज ७० हजारांहून अधिक रुग्ण आढळून येत होते. आता हाच आकडा ३० हजारांच्या खाली आला आहे. त्यामुळे राज्यातील आरोग्य यंत्रणेवरील ताण काहीसा कमी झाला आहे. राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी देखील माध्यमांशी बोलताना लॉकडाऊनबाबत महत्वाची माहिती दिली होती.**

मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक या मोठ्या शहरांमधील कोरोना रुग्णांची संख्या गेल्या काही दिवसांत लक्षणीय घटली आहे. कोरोना रुग्ण वाढीचा वेग कमी झाला आहे. त्यामुळे या शहरांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र ग्रामीण भागांत कोरोनानं हातपाय पसरले आहेत. त्यामुळे आरोग्य व्यवस्थेवरील ताण वाढला आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना आरोग्यमंत्र्यांनी महत्त्वपूर्ण संकेत दिले. '१ जूनपासून निर्बंध टप्प्याटप्प्यानं शिथिल केले जातील. कोरोना रुग्णांची संख्या नियंत्रणात असलेल्या जिल्ह्यांमधील निर्बंध हळूहळू मागे घेतले जातील, असं राजेश टोपे यांनी सांगितलं आहे.

सध्या राज्यात कठोर निर्बंध लागू आहेत. दुकानं केवळ सकाळी ७ ते ११ या वेळेतच सुरू ठेवण्याची मुभा आहे. याचा परिणाम अनेक ठिकाणी दिसून आला आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आला आहे. मुंबईसह एमएमआर रिजनमधील स्थिती नियंत्रणात आहे. नाशिक, नागपूरमधील परिस्थितीदेखील चिंताजनक नाही. त्यामुळे या भागातील निर्बंध १ जूनपासून हळूहळू शिथिल केले जातील. निर्बंध एकदम मागे घेण्याऐवजी टप्प्याटप्प्यानं मागे घेतले जातील. कोरोना रुग्णसंख्या कमी झालेल्या जिल्ह्यांसाठी या प्रकारचे निर्णय घेतले जातील, असं राजेश टोपे यांनी सांगितलं. एका मराठी वृत्तवाहिनीच्या वृत्तानूसार, राज्य सरकार ४ टप्प्यात अनलॉ कच्या प्रक्रियेला सुरुवात करणार असल्याची माहिती समोर आली आहे. पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात दुकाने उघडली जातील. गेल्या काही दिवसांत दुकाने बंद असल्यामुळे राज्यातील व्यापाऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. परिणामी पहिल्या टप्प्यात हे सर्व व्यवहार सुरु करण्यावर सरकार भर देण्याची शक्यता आहे. तर तिसऱ्या टप्प्यात हॉटेल, रेस्टॉरंटस, बार सुरु करण्यात येतील. त्यानंतर चौथ्या टप्प्यात सरकारकडून लोकल सेवा आणि धार्मिक स्थळे सुरु केली जातील. याच काळात जिल्हाबंदी कधी उठवायची याबाबत परिस्थिती पाहून निर्णय घेतला जाईल, असं सांगण्यात येत आहे.

### सुविचार

पारखून घेतले तर... कुणीच आपले नसते आणि समजून घेतले तर कोणीच परके नसते.

### थोडक्यात

### मंत्रिमंडळातून काँग्रेस बाहेर पडणार? ऊर्जामंत्री नितीन राऊत म्हणतात...

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** मागासवर्गीय शासकीय कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करणारा जीआर रद्द करण्याच्या मागणीवरून बुधवारी सरकार दरबारी बराच खल झाला. मात्र, जीआर रद्द झाला नाही किंवा त्याला स्थगितीही दिली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यावरुन, काँग्रेस विरुद्ध राज्य सरकार असा संघर्ष सुरूच असल्याचे दिसून येते. काँग्रेस नेते आणि ऊर्जामंत्रीनितीन राऊत यांनी काँग्रेस नेहमीच मागासवर्गीयांच्या पाठिशी असल्याचे म्हटले. तसेच, मंत्रिमंडळातून बाहेर पडण्याच्या निर्णावरही त्यांनी भाष्य केले. पदोन्नतीतील आरक्षणाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक बुधवारी झाली. त्यात अजित पवार आणि ऊर्जामंत्री नितीन राऊत यांच्यात बरीच खडाजंगी झाल्याचे समजते. उपसमितीला न विचारताच हा ७ मे रोजीचा हा जीआर कसा रद्द करण्यात आला, सामान्य प्रशासन विभागाने परस्पर निर्णय कसा घेतला, असा हल्लाबोल राऊत यांनी केला.



### 'कमी प्रतिकारशक्तीमुळे होणारा म्युकरमायकॉसिस संसर्गजन्य नाही'

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा):** देशात सध्या कोरोनाचं संकट थैमान माजवत आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमध्ये अनेक



लोक बळी पडले असून सध्या आरोग्य यंत्रणेवर अभूतपूर्व असा ताण आहे. अशातच आता म्युकरमायकॉसिसचं नवं संकट उभं ठाकलं आहे. अत्यंत दुर्मिळ असणारा हा रोग आता इतका आढळून येतो आहे की केंद्र सरकारने या रोगाचा समावेश साथरोग कायद्यामध्ये करुन याला महामारी घोषित केलं आहे. म्युकरमायकॉसिसबाबत सध्या पुरेशी जागृती झाली नाहीये. यासंदर्भात आता आरोग्य मंत्रालय लोकांना माहिती देत आहे. बुरशीचा रंग वेगवेगळ्या भागात वेगवेगळा विकसित होऊ शकतो. म्युकरमायकॉसिस हा संसर्गजन्य आजार नाहीये, असं विश्लेषण Delhi AIIMS चे डायरेक्टर डॉ. रणदीप गुलेरिया यांनी केलं आहे. ज्या लोकांमध्ये कमी रोग प्रतिकारक शक्ती आहे, त्यांना म्युकरमायकॉसिस, कॅनडिडा आणि एस्पारोजेनस हे दुर्मिळ आजार होतात. ही बुरशी मुख्यत: सायनस, नाक, डोळ्याभोवतीच्या हाडांमध्ये आढळते तसेच ती मेंदू देखील प्रवेश करू शकते.

## आदित्य ठाकरेंबाबत मुंबईत भाजपने केली अनोख्या योजनेची घोषणा

**मुंबई (सम्यक कासारे)-** पर्यावरणमंत्री आणि मुंबई उपनगराचे पालकमंत्री आदित्य ठाकरे यांच्याविरोधात भाजपने आक्रमक भूमिका घेतली आहे. आदित्य ठाकरे यांच्यावर निशाणा साधत भाजपने त्यांच्यासंबंधित एक योजनाच जाहीर करून टाकली आहे. भाजपचे आमदार अतुल भातखळकर यांनी याबाबतचा एक व्हिडिओ जारी करत आपली भूमिका मांडली आहे. 'उपनगराचे पालकमंत्री आदित्य ठाकरे यांना उपनगरामध्ये दाखवा आणि १८ ते ४४ या वयोगटातील नागरिकांनी मोफत लस मिळवा, अशी योजनाच मी स्वत: आणि मुंबई भाजपच्या वतीने आम्ही आणली आहे,' असं म्हणत भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी कॅबिनेट मंत्री आदित्य ठाकरे यांच्याविरोधात हल्लाबोल केला आहे.

'वर्ष झालं पण उपनगराचे पालकमंत्री इथं दिसतच नाहीत. निसर्ग वादळ येऊन गेलं, त्यानंतर काही दिवसांपूर्वीही एक चक्रीवाळ येऊन गेलं. वर्सोवा, बोरिवली या भागातील मच्छीमारांचं नुकसान झालं, सर्वसामान्यांचं नुकसान झालं, लोकांचे रस्ते बंद झाले, पण आमचे पालकमंत्री प्रत्यक्ष



दिसत नाहीत, फक्त ऑनलाईन दिसतात. आदित्य ठाकरे कुठे आहेत? त्यांनी किती कोविड सेंटर्सला भेटी दिल्या? ते घरात लपून बसले आहेत. म्हणूनच उपनगरात आदित्य ठाकरेंना दाखवा आणि लसीकरण मोफत मिळवा, ही योजना भाजपने लागू केली आहे,' असंही अतुल भातखळकर यांनी सांगितलं आहे.

## बारावीचीही परीक्षा रद्द करण्याकडे राज्याचा कल



**मुंबई (नितीन देवळेकर): दहावीची परीक्षा रद्द केल्यानंतर मूल्यमापन कसे करावे, याबाबत अद्यापही निर्णय घेऊ न शकलेल्या राज्याच्या शिक्षण विभागाने बारावीच्या परीक्षेसाठीही पर्याय शोधायला हवा, अशी भूमिका केंद्रीय स्तरावरील रविवारच्या बैठकीत घेतली. त्यामुळे दहावीपाठोपाठ बारावीची परीक्षा रद्द करण्याकडे राज्याचा कल असल्याचे दिसते.**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळासह इतर केंद्रीय, आंतरराष्ट्रीय मंडळे, राज्यमंडळ यांनी दहावीची परीक्षा रद्द केली. त्यानंतर बारावीची परीक्षाही रद्द करण्याची मागणी पालकांनी केली. त्या अनुषंगाने केंद्रीय स्तरावर रविवारी बैठक घेण्यात आली. त्यात राज्याच्या शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी भूमिका मांडली. 'विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यायला हवे. बारावीच्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापनाचे सूत्र केंद्रीय पातळीवर समान असावे, बारावीच्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन मंडळाच्या परीक्षेव्यतिरिक्त इतर मार्गांनी करणे शक्य असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे,' असे गायकवाड म्हणाल्या.

'विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि मानसिकता याचा विचार करणे आवश्यक आहे. बारावीनंतरच्या अनेक अभ्यासक्रमांच्या परीक्षा या प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून होतात.

बारावीच्या परीक्षाबाबत सध्या असलेली अनिश्चितता लवकर दूर करून विद्यार्थी हिताचा निर्णय घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या मूल्यांकनाचे समान सूत्र असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शिक्षकांना प्राधान्याने लस देणेही गरजेचे आहे. याबाबत मुख्यमंत्री आणि तज्ज्ञांशी चर्चा करून याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल,' असे गायकवाड यांनी बैठकीत सांगितले.

## कोरोना रुग्णसंख्या दर कमी करण्यासाठी प्रतिबंधात्मक निर्बंधांची अधिक कडक अंमलबजावणी आवश्यक - पालकमंत्री जयंत पाटील

**सांगली (प्रथमेश चव्हाण)-** जिल्ह्यात सध्या कोरोना रुग्णांचा पॉझिटिव्हिटी रेट टप्प्याटप्प्याने कमी होत असला तरी सरासरी तो २२ टक्केपर्यंत आहे. हा पॉझिटिव्हिटी रेट आणखी कमी होणे आवश्यक असल्याने ५ मे पासून २६ मे पर्यंत सुरू असणाऱ्या कडक निर्बंधांबाबत २८ दिवसानंतर म्हणजे १४ – १४ दिवसांचे दोन टप्पे पूर्ण झाल्यानंतर कोरोना रुग्ण संख्येमध्ये किती फरक पडतो याची पुन्हा एकदा मिमांसा केली जाईल व पुढील निर्णय घेतला जाईल, असे पालकमंत्री जयंत पाटील यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी ज्या गावांमध्ये ग्राम समित्यांनी निर्बंधांची अंमलबजावणी अत्यंत चांगली केली, तेथील रुग्ण संख्या कमी आल्याचे निदर्शनास आल्याचे सांगून जिल्ह्यातील सर्वच ग्राम समित्यांनी अधिक सक्षमपणे, एकजिनसीपणे काम करणे आवश्यक आहे. तसेच पोलीस यंत्रणेने प्रतिबंधात्मक निर्बंधांची अधिक कडक अंमलबजावणी करावी, असे निर्देश यावेळी दिले. कोरोना सद्यस्थितीचा आढावा पालकमंत्री जयंत पाटील यांनी आज ऑनलाईन बैठकीद्वारे घेतला. यावेळी सहकार व कृषी राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, आमदार सदाभाऊ खोत, आमदार अरुण लाड, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार अनिल बाबर, आमदार सुधीर गाडगीळ, आमदार सुमनताई पाटील, आमदार विक्रम सावंत, आमदार मानसिंगराव नाईक, जिल्हाधिकारी डॉ. अभिजीत चौधरी, पोलीस अधीक्षक दीक्षित गेडाम, जिल्हा परिषदेचे



मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र डुडी, महानगरपालिकेचे आयुक्त नितीन कापडणीस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रदीप दीक्षित, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय साळुंखे, निवासी उपजिल्हाधिकारी मौसमी चौगुले- बर्डे , जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मिलिंद पोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री जयंत पाटील यांनी या बैठकीत जिल्ह्यात म्युकर मायकोसिसचा धोका वाढत आहे, त्यामुळे जिल्हयाच्या मध्यवर्ती ठिकाणातूनच या रुग्णांवर उपचार व्हावेत. तसेच या रुग्णांना उपचार देणाऱ्या डॉक्टर्सना या आजाराचा धोका कमी करण्यासाठी कोणती अधिक काळजी घ्यावी, यासाठी ऑनलाईन वर्कशॉप घ्यावा, असे सूचित केले.

## 'हा' महाराष्ट्रावर अन्यायच!; एकनाथ खडसे यांची पंतप्रधान मोदींवर टीका

**ठाणे (तृप्ती गोरे):** तौत्के चक्रीवादळामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. गुजरातमध्ये नुकसान झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लगेचच पाहणी दौरा करत एक हजार कोटी रुपयांची मदत तिथे जाहीर केली. मात्र, महाराष्ट्रात त्यांनी दौराही केला नाही आणि मदतही जाहीर केली नाही. हा महाराष्ट्रावर एकप्रकारे अन्यायच आहे, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते एकनाथ खडसे यांनी मोदींवर टीका केली आहे. एकनाथ खडसे आज जळगाव येथे आले होते. यावेळी



कार्यकर्त्यांच्या भेटी-गाठी घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. खडसे पुढे म्हणाले, ज्याचे नुकसान होते, तो शेवटी देशाचा नागरिक आहे. त्याला राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडून मदतीची अपेक्षा असते. राज्यातील नागरिकांना मदत करणे ही राज्याची जबाबदारी आहे. राज्य सरकार सध्या आढावा घेत आहे. त्यानंतर मदत करेल. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी गुजरातमध्ये जाऊन मदतीची घोषणा करतात. त्यामुळे महाराष्ट्रातील नुकसानग्रस्त लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. माझी मोदींना विनंती आहे, त्यांना महाराष्ट्राला जी काही मदत करायची असेल ती लवकर करावी, अशी मागणीही एकनाथ खडसे यांनी केली. सध्या राज्यात म्युकरमायकोसिस आजाराचे रुग्ण वाढत आहेत. अशा परिस्थितीत रुग्णांना अँफोटेरेसीन बी इंजेक्शनची गरज भासत आहे.

## चक्रीवादळ YAASचा मोठा धोका

### भारतीय हवामान विभागाने दिला हा इशारा

**मुंबई (जसबीरकौर भामरा)-** आणखी एक चक्रीवादळ येत्या २४ तासात धडकण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. हे चक्रीवादळ मोठ्या भयंकर वादळात रुपांतरीत होईल, असा इशारा हवामान विभागाने दिला आहे. त्यामुळे नौदल आणि वायु सेनेकडून अधिक खबरदारी घेण्यात आली आहे. या चक्रीवादळाबाबत भारतीय हवामान विभागाचेराष्ट्रीय हवामान अंदाज केंद्राकडूनसांगण्यात आले की, यास उत्तर-वायव्येकडे जात असताना, सोमवारी पहाटे ते चक्रीवादळ वादळामध्ये रूपांतरित होईल आणि येत्या २४ तासांत ते उग्ररुप धारण करु शकते. चक्रीवादळ तीव्र वादळात बदल होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने उपग्रह आणि समुद्राच्या गतीशीलतेच्या सहाय्याने घेतलेल्या छायाचित्रांचा अभ्यास केल्यानंतर यावर भाष्य करण्यात आले आहे. हवामान खात्याने म्हटले आहे की, चक्रीवादळ यास उत्तर-वायव्य दिशेने वाटचाल करत राहील आणि हळूहळू ते तीव्र



होईल. २६ मे पर्यंत पश्चिम बंगाल आणि उत्तर ओडिशाच्या सीमेजवळ उत्तर पश्चिम बंगालच्या उपसागरात पोहोचेल. २६ मे रोजी संध्याकाळपर्यंत वादळ म्हणून पारादीप आणि सागर बेटांच्या दरम्यान उत्तर ओडिशा-पश्चिम बंगाल ओलांडणे अपेक्षित आहे. दरम्यान, 'यास' चक्रीवादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी सैन्याचे तिन्ही दल आणि आयसीजीने अनेक पावले उचलली आहेत. संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे की, 'पश्चिम किनाऱ्यावरील एचएडीआर आणि बचाव कार्यामुळे भारतीय नौदलाने यापूर्वी भुवनेश्वर आणि कोलकाता येथे १० एचएडीआर पॅलेट वितरित केले आहेत आणि पोर्ट ब्लेअरवर पाच पॅलेट तयार आहेत.' भारतीय नौदलाला चार डायव्हर्स आणि १० बचाव तुकड्यांची कोलकाता, भुवनेश्वर आणि चिलिका येथे यापूर्वी मदत फौज तैनात करण्यात आली आहे, जेणेकरुन अल्पावधी सूचनेवरून नागरी प्रशासनाला मदत करता येईल. संरक्षण मंत्रालयाकडून सांगण्यात आले आहे की, भारतीय वायुसेनाचक्रीवादळ 'यास' मुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाण्याच्या तयारीसाठी जामनगर, वाराणसी, पाटणा, अरोकोनम आणि नॅशनल डिजास्टर रिस्पॉन्स फोर्सच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

## संपूर्ण आघेऊन नुकसानग्रस्तांना मदत करणार, कुणीही वंचित राहणार नाही; रत्नागिरी दौऱ्यात मुख्यमंत्र्यांची ग्वाहा

**रत्नागिरी (अमोल गुडेकर)-** तौक्ते चक्रीवादळाने नेमके किती नुकसान झाले याबाबतचे पंचनामे पूर्ण होवू द्या, संपूर्ण आढावा घेऊन व्यवस्थित मदत केली जाईल, कुणीही वंचित राहणार नाही, असे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी रत्नागिरी येथे केले. जिल्ह्यात या चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीबाबत मुख्यमंत्र्यांनी एका बैठकीत आढावा घेतला. यावेळी रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. अनिल परब, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार तसेच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री व सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत आदिंची प्रमुख उपस्थिती होती. तौक्ते चक्रीवादळाने जिल्ह्यातील ५ तालुक्यांत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यात अधिक नुकसान राजापूर व रत्नागिरी तालुक्यात आहे. वादळाचा फटका बसलेल्या सिंधुदूर्ग व रत्नागिरी या दोन्ही जिल्ह्यांचा पहाणी दौरा करण्यासाठी मुख्यमंत्री एक दिवसाच्या दौऱ्यावर होते. याची सुरुवात रत्नागिरी येथील बैठकीने झाली. जिल्ह्यात



चक्रीवादळाने आंबा आणि काजू तसेच नारळाच्या बागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर पंचनामा योग्य पध्दतीने करुन नेमेकेपणाने आकडेवारी सह प्रस्ताव सादर करा, असे निर्देश मुख्यमंत्री महोदयांनी या बैठकीनंतर अधिकाऱ्यांशी बोलताना दिले.

जिल्ह्यातील कोव्हीड परिस्थितीचाही आढावाही याच बैठकीत घेण्यात आला. रुग्णांना चांगली उपचार सुविधा आपण देत आहोत. सोबतच रुग्णसंख्या प्रामुख्याने मृत्यूचे प्रमाण कमी होईल या दृष्टिकोनातून सर्वांनी प्रयत्न करावेत, असे ते म्हणाले. दुसऱ्या लाटेनंतर तिसरी लाट येईल, असे म्हटले जात असले तरी योग्य ती खबरदारी आणि उपाय योजल्याने आपण ती येणारच नाही यासाठी येणाऱ्या काळात प्रयत्न करू, असेही मुख्यमंत्री म्हणाले. जिल्ह्यात सुरु असणारे लसीकरण आणि त्याबाबतीत इतर माहिती यावेळी सादर करण्यात आली.

जिल्ह्यात झालेल्या नुकसनीबाबत जिल्हाधिकारी लक्ष्मीनारायण मिश्रा यांनी यावेळी सादरीकरण केले. या चक्रीवादळात जिल्ह्यात २ जणांचा मृत्यू झाला असून ८ जण जखमी झाले आहेत. मृत पशुधनाची संख्या ११ आहे. जिल्ह्यात १७ घरे पूर्णत: बाधित झाली असून अंशत: बाधित घरांची संख्या ६७६६ आहे. यात सर्वाधित दापोलीत २२३५ आहेत. रत्नागिरी तालुक्यात १०८४ तर राजपूरातील ८९१ घरांचे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या गोठ्यांची जिल्ह्यातील संख्या ३७० इतकी आहे. वादळात वाऱ्यामुळे १०४२ झाडे पडली. यात सर्वाधित ७९२ झाडे राजापूर तालुक्यात पडली. रत्नागिरीत ही संख्या २५० इतकी आहे. चक्रीवादळात ५९ दुकाने व टपऱ्यांचे नुकसान झाले.



# ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला ठिगळं जोडण्याची गरज

संपादक:- राकेश शंकर गोरे

**कोरोना बधितांची एकुणातील आकडेवारी काहीशी कमी होत असल्याचे चित्र असले तरी, तो शहरी भागातील वाढत्या लसीकरणाचा, जनजागरणाचा व आरोग्य सेवेचा परिणाम आहे; त्या उलट आता ग्रामीण भागात कोरोनाचा उद्रेक होताना दिसत आहे, त्यामुळे तेथील अगोदरच डळमळीत असलेली आरोग्य व्यवस्था सुधारण्याचे मोठे आव्हान यंत्रणेसमोर आहे. गावाकडील रुग्णांचा शहरात येत असलेला लोंढा पाहता तेथील आरोग्य यंत्रणेच्या कमजोरीचे पितळ उघडे पडत असून हा लोंढा रोखायचा असेल तर त्यांना स्थानिक पातळीवरच आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे बनले आहे.**

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत देशात महाराष्ट्राचा नंबर अव्वल होता, परंतु गेल्या काही दिवसांपासून मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर सारख्या मोठ्या शहरातील रुग्णसंख्येचा आलेख कमी झाल्याने राज्यात काहीशी दिलासादायक स्थिती आकारास आलेली दिसत आहे. यात आपल्या वऱ्हाडाचाही विचार करायचा झाल्यास; अकोला, बुलढाणा व वाशीम या शहरातील बाधितांची संख्या हळूहळू कमी होत आहे, पण म्हणून कोरोना आटोक्यात आला असे समजून बेफिकीर होता येऊ नये. कडक निर्बंधातून काहीशी सवलत मिळताच बाजारात गर्दी होऊ लागल्याचे पाहता ही गर्दी पुन्हा आपल्याला संकटाकडे नेण्याची शक्यता नाकारता येऊ नये. महत्वाचे म्हणजे, मोठ्या शहरातील रुग्णसंख्या घटत असली तरी ग्रामीण भागात मात्र ती वाढतांना दिसत आहे व तीच खरी चिंतेची बाब आहे; कारण तेथील आरोग्य व्यवस्थेच्या अनास्थेची लक्तरे यापूर्वीच वेशीवर टांगली गेलेली आहेत. बाधितांना जिल्ह्याच्या ठिकाणी धाव घ्यावी लागत आहे ती त्यामुळेच.

सरकारी असो की खासगी, आरोग्य सुविधेबाबत अकोला प्रगत आहे त्यामुळे येथील कोरोनाची स्थिती बऱ्यापैकी नियंत्रणात येताना दिसत आहे, परंतु जिल्ह्याचा विचार करता गेल्या एका आठवड्यात ग्रामीण भागात ९१ जणांचे कोरोनामुळे बळी गेले असून पावणे तीन हजारावर बाधित आढळून आल्याची आकडेवारी आहे. ५० पेक्षा अधिक गावे प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करावी लागली आहेत. बुलडाण्यात यापेक्षा वेगळी स्थिती नाही. तेथे सद्यस्थितीत ३७ टक्के बाधित शहरात असून, तब्बल ६३ टक्के ग्रामीण भागात आहेत. जिल्ह्यातील ५८३ पैकी ३४३ प्रतिबंधित क्षेत्रे ग्रामीण भागात असून, १७७ गावे सील करण्याची वेळ आली यावरून धोक्याची व भीतीची स्थिती स्पष्ट व्हावी. वाशिममध्ये देखील शहरात पाच हजारावर बाधित असताना ग्रामीण मध्ये सात हजारांपेक्षा अधिक बाधित आहेत, तसेच प्रतिबंधित क्षेत्रही ग्रामीण मध्येच अधिक आहेत. अर्थात लोकसंख्या व क्षेत्रफळाच्या निकषावर शहर व ग्रामीण भागातील हा फरक स्वाभाविक असल्याचा युक्तिवाद केला जाईलही, परंतु आरोग्य सुविधांचा निकष लावला तर तेथील आरोग्य विषयक दुर्दशेतून सामोरे जावे लागणाऱ्या संकटाची भीती वाढून गेल्याखेरीज राहू नये. ग्रामीण भागातील सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्रे किंवा एकूणच आरोग्य व्यवस्थांमधील परावलंबित्व लपून राहिलेले नाही. कोरोनासाठीच्या साध्या एचआर सिटीस्कॅनची चाचणी करायची




तर ग्रामस्थांना शहर गाठावे लागते अशी वस्तुस्थिती आहे. आरोग्य केंद्र आहे तर साहित्य साधने नाहीत व ती आहे तर प्रशिक्षित डॉक्टर्स नाहीत, त्यामुळे रुग्णांची हेळसांड होते अशी नेहमीच ओरड होत आली आहे. बाधितांना विलगीकरणात ठेवायचे तर आरोग्य केंद्रात तेवढे बेड्स नाहीत. बेड्स आहेत तर ऑक्सिजन, व्हेंटिलेटरच्या सोयी नाहीत; दवाखान्याच्या इमारती ढंगाच्या म्हणजे सुविधायुक्त नाहीत, कशाला दोनच दिवसांपूर्वी वाशिमच्याच जिल्हा रुग्णालयात स्वच्छतेचा कसा बोजवारा उडाला आहे याची आपबिती सांगणाऱ्या व्हिडिओ क्लिप्स व्हायरल झालेल्या साऱ्यांना बघायला मिळाल्या आहेत. अशा आव्हानात्मक स्थितीत कोरोनाच्या संकटाशी लढायचे तर ते मोठे जिकिरीचेच आहे. पण या समस्या सोडवण्याऐवजी अधिकारीवर्ग गावात कोरोना बाधितांची संख्या वाढली तर सरपंचांवर कारवाई करण्याच्या धमक्या देत आहेत, काय ही तऱ्हा?

यात समाधान याचेच की, कोरोनाच्या आपद स्थितीमुळे अन्य विकासकामे खोळंबली असली तरी बहुतेक आमदार, खासदारांनी त्यांना मिळणाऱ्या निधीचा विनियोग कोरोनाशी निपटण्यासाठी चालविला आहे, तर काही बाजार समित्या व सामाजिक संस्थांनीही त्यासाठी पुढाकार घेतला आहे. व्यवस्थांना दोष देत न बसता लोकप्रतिनिधी व संस्थांनी चालविलेली ही धडपड दिलासादायक आहे. काही ठिकाणी लोकसहभागातून सेंटर उभारले गेले आहेत. अन्यही काही ठिकाणी तसे प्रयत्न सुरू झाले आहेत. असे साऱ्यांचेच बळ एकवटले तर ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांचे बळकटीकरण होऊ शकेल. आजच्या घडीला ग्रामीण भागात फैलावू पहात असलेला कोरोना रोखायचा तर तेच गरजेचे आहे. अर्थात हा तात्कालिक उपायांचा भाग झाला, यातून सारी व्यवस्था कायमस्वरूपी सुधारेल असा भ्रम बाळगण्याचेही कारण नाही, पण किमान फाटलेल्या आकाशाला ठिगळं जोडण्याचे समाधान तर लाभेल.

## मुलांमधील कोविडोत्तर गुंतागुंत घातक; बालरोगतज्ज्ञांचा इशारा

**बेंगळुरू (वृत्तसंस्था)-** काळ्या बुरशीनंतर आता करोनातून बऱ्या झालेल्या मुलांमध्ये 'मल्टी सिस्टीम इनफ्लमेटरी सिंड्रोम' म्हणजे 'एमआयएस-सी' हा आजार काळजी करण्यासारखाच आहे, असे मत वैद्यकीय वर्तुळात व्यक्त केले जात आहे.

कोविड साथ शिखरावर असताना काही आठवड्यातच हा आजार दिसून आला होता. मुलांमध्ये या आजाराच्या संसर्गाची शक्यता जास्त असते.

फोर्टिस हेल्थकेअरचे बालरोगतज्ज्ञ डॉ. योगेशकुमार गुप्ता यांनी सांगितले, की एमआयएस-सी हा जीवघेणा आजार आहे असे आपण म्हणणार नाही, पण मुलांमध्ये तो उग्र रूप धारण करून हृदय, यकृत, मूत्रपिंड यांना बाधित करतो. कोविड झाल्यानंतर चार ते सहा आठवड्यांनी हा संसर्ग दिसून येतो. गुप्ता यांच्या मते एमआयएस सी हा आजार कोविड विरोधातील अँटीजेनला शरीराने निर्माण केलेल्या प्रतिक्रियेमुळे निर्माण होतो. कोविड संसर्ग हा सौम्य किंवा मध्यम असू शकतो. एकदा शरीरात प्रतिपिंड तयार झाले, की मुलांमध्ये त्यावर ॲलर्जीसारखी प्रतिक्रिया उमटते. गुप्ता यांच्या मते एमआयएस-सी या रोगामुळे यकृत, मूत्रपिंड यावर परिणाम होतो. इतर देशात कोविड १९ च्या शिखर काळात एमआयएस सी या रोगाची नोंद झालेली आहे. गेल्या वर्षी असे तीन रुग्ण सापडले होते, तर करोनाच्या दुसऱ्या



लाटेत फॉर्टिस हेल्थकेअरमध्ये दोन रुग्ण सापडले आहेत. करोना साथीचा शिखर काळ संपल्यानंतर एमआयएस-सी आजाराचे आणखी रुग्ण येण्याची शक्यता आहे, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

कोविड तज्ज्ञ समितीचे सदस्य असलेले साथरोगतज्ज्ञ डॉ. गिरिधर बाबू यांनी सांगितले, की या रोगाचे प्रमाण कमी असले तरी पुढील लाट येण्यापूर्वी हा रोग समजून घेण्याची गरज आहे. कारण फोर्टिससारख्या आरोग्य सुविधा सगळीकडे उपलब्ध नाहीत. मुलांमध्ये संसर्ग टाळणे खूप महत्त्वाचे असून त्या रोगाची लक्षणे निश्चित करणे गरजेचे आहे.

## महामार्गाशेजारच्या गावांमध्ये करोना उद्रेक

**बदलापूर (तृप्ती गोरे):** ठाणे जिल्ह्यात लसीकरणात आघाडी घेणाऱ्या मुरबाड तालुक्यात गेल्या काही दिवसांत महामार्गाशेजारच्या गावांमध्ये करोनाचा संसर्ग वाढल्याचे दिसून आले आहे. मुरबाड तालुक्यात मुंबई-अहमदनगर महामार्गावर असलेल्या



बाजारपेठेचे गाव म्हणून ओळख असलेल्या सरळगाव, वडवली, उंबरपाडा या गावांमध्ये मोठ्या संख्येने करोनाचे रुग्ण आढळून येत आहेत. तसेच गेल्या काही दिवसांमध्ये झालेल्या मृत्यूंची संख्याही अधिक असल्याने प्रशासनाची धावाधाव सुरू झाली आहे. या संपूर्ण गावांची चाचणी केली जात असून गावात संचारबंदीसदृश चित्र आहे. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण तालुका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुरबाड तालुक्यात लसीकरणाचा कार्यक्रम यशस्वीपणे सुरू आहे. जिल्ह्यात सर्वाधिक लसीकरण तालुक्यात झाल्याने संसर्ग रोखण्यास मदत होईल, अशी आशा होती. मात्र कल्याण-अहमदनगर राज्यमार्गाशेजारी असलेल्या गावांमध्ये करोना संसर्ग गेल्या काही दिवसांत वाढल्याचे दिसून आले आहे. यात तालुक्यातील सरळगाव या मोठ्या बाजारपेठेच्या गावाचा समावेश आहे. तसेच वडवली, उंबरपाडा या गावांमध्येही गेल्या काही दिवसांमध्ये करोनाचे रुग्ण मोठ्या संख्येने वाढले आहेत. वडवली गावात आतापर्यंत १४ जणांचा मृत्यू झाला आहे, तर सरळगाव ग्रामपंचायतीत येणाऱ्या उंबरपाडा, दहीगाव या गावांत गेल्या १५ दिवसांत २८ मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या गावांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सरळगावमध्ये दररोज शेकडो शेतकरी, कामगार, मजूर व्यवसाय, खरेदी-विक्रीसाठी येत असतात. त्यामुळे या ठिकाणी संसर्ग वाढल्याची भीती आहे.

## ज्येष्ठांना लस मिळण्यासाठी 'वुई आर फॉर यू' संस्थेची मोहीम

**ठाणे (आकाश कांबळे):** ठाणे शहरात गेल्या काही दिवसांपासून लशीच्या कमतरतेमुळे ज्येष्ठ नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. लस घेण्यासाठी ज्येष्ठ नागरिक पहाटे तीन वाजल्यापासून केंद्रावर रांगा लावत असून अनेकदा केंद्रावर लस उपलब्ध नसल्यामुळे या नागिरकांना लशीविनाच परतावे लागत आहे. ही बाब लक्षात घेऊन करोनाकाळात गेले एक ते दीड वर्षांपासून काम करणारी 'वुई आर फॉर यू' ही संस्था ज्येष्ठ नागरिकांच्या मदतीला धावून आली आहे. लशीसाठी ज्येष्ठांना पहाटेपासून रांगेत उभे राहावे लागू नये यासाठी या संस्थेचे स्वयंसेवक केंद्रांवर पहाटे जाऊन ज्येष्ठ नागरिकांसाठी रांगेत उभे राहत आहेत. तसेच लसीकरणासाठी त्यांना मार्गदर्शनही करत आहे. गेल्या काही




दिवसांपासून सर्व ठिकाणी लशीचा तुटवडा भासू लागला असून लसीकरण मोहिमेत गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच दुसरी मात्रा घेण्याची कालमर्यादा संपत आल्याने ज्येष्ठ नागरिक हवालदिल झाले असून ते पहाटे तीन वाजल्यापासून केंद्रांवर रांगा लावत आहेत. मात्र, अनेकदा केंद्रांवर लस उपलब्ध नसल्यामुळे त्यांना पुन्हा घरी परतावे लागत आहे. यात, अनेक नागरिकांना पायाची व्याधी आणि इतर आजार आहेत त्यामुळे त्यांना एवढा वेळ रांगेत उभे राहणे शक्य होत नाही. ही बाब लक्षात घेऊन ठाण्यातील 'वुई आर फॉर यू' या संस्थेने ज्येष्ठ नागरिकांच्या लसीकरणासाठी मदत क्रमांक तयार केला. हा मदत क्रमांक संस्थेने समाजमाध्यमांवर प्रसारित केला आहे.

## लस खरेदी निविदेला प्रतिसाद नाही

**नवी मुंबई (सातिश सोनावणे)-** लस उपलब्ध होत नसल्याने नवी मुंबई महापालिका प्रशासनाने लस खरेदीसाठी जागतिक निविदा काढली असून शनिवारी याची अंतिम मुदत आहे. शुक्रवापर्यंत निविदेला प्रतिसाद मिळाला नाही, मात्र प्रशासनाला प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे. यासाठी लस निर्मात्या कंपन्यांबरोबर चर्चा सुरू असून या निविदा प्रकियेला मुदतवाढ देण्याची तयारी पालिका प्रशासनाने केली आहे. मुंबईप्रमाणे नवी मुंबई महापालिका प्रशासनानेही शहरातील नागरिकांचे मोफत लसीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी चार लाख लस कुप्या खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी पालिकेने जागतिक



निविदा काढली आहे. पालिका प्रशासन लसनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांशी याबाबत विचारणा करीत असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली. त्यामध्ये भारत बायोटिक, सिरम तसेच स्पुटनिक या कंपन्यांनी संपर्क केला असून खासगी रुग्णालयांना लस प्राप्त होत असून पालिकेच्या निविदेलाही प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे; परंतु आठवडाभरात अद्याप लस निविदेला प्रतिसाद मिळाला नाही. शनिवारी दिवसभरात निविदा प्रक्रियेला प्रतिसाद मिळतो का याकडे प्रशासनाचे लक्ष लागले आहे. प्रतिसाद मिळाला नाही तर निविदा प्रक्रियेला मुदतवाढ देण्याची शक्यता आहे. खासगी रुग्णालयात नागरिकांना ८५० रुपयांत लस दिली जात आहे. महापालिका स्वत: लस खरेदी करून मोफत लसीकरण करणार आहे. नवी मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प जवळजवळ ४ हजार कोटींपर्यंत असून शेजारील महापालिकेच्या तुलनेत पालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याने चार लाख लस कुप्यांची खरेदी करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. ४ लाख लस कुप्या खरेदीसाठी निविदा मागवलेल्या आहेत. त्यासाठी लस कंपन्यांकडून पालिकेकडे विचारणा करण्यात आली आहे. शहरातील नागरिकांची सुरक्षा हे प्राधान्य असून त्यासाठी मोफत लसीकरणासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे.

## रायगडमधील मच्छीमारांचे ३२ कोटींचे अनुदान रखडले

**उरण (गणेश बागडे)-** महाराष्ट्र शासनाकडून राज्यातील मच्छीमारांना २०१८ या वर्षातील डिझेलच्या वापरावर देण्यात येणाऱ्या परताव्याचे (अनुदान) ३२ कोटी रुपये शासनाच्या मत्स्य विभागाकडून येणे बाकी आहेत. मच्छीमारांचा खर्च केलेला हक्काचा हा निधी अडकला असल्याने करोनाच्या आर्थिक संकटात मच्छीमारांना त्यांचे परतावे मिळावे, अशी मागणी मच्छीमारांकडून केली जात आहे. याकरिता मच्छीमार संस्थांकडून याचा पाठपुरावा केला जात असला तरी अनुदानाची प्रतीक्षा आहे.

मच्छीमारांना मागील चार वर्षांत अनेक संकटांना सामोरे जावे लागत आहे. मागील तीन वर्षांपासून वादळांमुळे प्रचंड नुकसान सहन करावे लागले आहे. शासनाकडून मच्छीमारांना मासेमारीसाठी लागणाऱ्या डिझेलवर अनुदान दिले जाते. सुरुवातीला मच्छीमार डिझेलचे पैसे भरून नंतर त्याच्या अनुदानाची देयके स्थानिक मत्स्य विभागाकडे सादर करतात.

## रुग्णशय्येसाठीची वणवण थांबली!

**ठाणे (शकिल शेख)-** जिल्ह्यातील शहरी तसेच ग्रामीण भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून करोनाचा प्रादुर्भाव आटू लागल्याने करोना रुग्णालयांवरील ताणही कमी होऊ लागला आहे. जिल्ह्यातील करोना रुग्णालयांमधील एकूण १७ हजार १३३ पैकी ११ हजार १२ रुग्णशय्या रिकाम्या आहेत. हे प्रमाण ६४ टक्क्यांहून अधिक आहे. रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९५.१३ टक्के इतके आहे. महिनाभरापूर्वी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपचाराकरिता रुग्णशय्या मिळविण्यासाठी वणवण फिरत होते. मात्र आता हे चित्र बदलू लागले आहे.

ठाणे जिल्ह्यात मार्च महिन्यापासून करोनाचा प्रादुर्भाव वाढला. या काळात जिल्ह्यात



दररोज ५ ते ६ हजार रुग्ण आढळून येत होते. एप्रिल महिनाअखेपर्यंत हे चित्र कायम राहिले. या कालावधीत उपचाराधीन रुग्णांची संख्या ५० हजारांच्या आसपास होती. रुग्णसंख्येच्या तुलनेत करोना रुग्णालयामधील रुग्णशय्या पुरेशा नव्हत्या. गेल्या काही दिवसांमध्ये हे चित्र बदलले आहे. मे महिन्याच्या सुरुवातीपासून रुग्णसंख्या कमी होण्यास सुरुवात झाली आहे. जिल्ह्यात दररोज १५००च्या आसपास रुग्ण आढळून येत आहेत. उपचाराधीन रुग्णांची संख्या १५ हजारांच्या आसपास आहे. त्यामध्ये जोखमीचे ३३४७ रुग्ण, तर अतिजोखमीचे ५०३ रुग्ण आहेत. रुग्णसंख्येत घट झाल्यामुळे आरोग्य यंत्रणेवरील ताण कमी झाला आहे. करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य शासनाने लागू केलेल्या टाळेबंदीचे सकारात्मक परिणाम दिसत आहेत, असा दावा जिल्हा प्रशासनामार्फत केला जात आहे. रुग्णसंख्येत मोठी घट झाली आहे. तसेच रुग्णांना वेळीच उपचार देण्यात येत असून यामुळे रुग्ण बरे होण्याचे प्रमाण वाढले आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये दररोज दोनशेपेक्षा कमी रुग्ण आढळत आहेत.

रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९६ टक्क्यांवर आले आहे. महापालिका तसेच खासगी रुग्णालयांमधील ७१ टक्के रुग्णशय्या रिकाम्या आहेत.

## खारघर खाडीक्षेत्रातून बेकायदा वाळू उपसा

**पनवेल (प्रतिनिधी)-** करोनामुळे प्रशासन व्यस्त असल्याचा फायदा घेत पारगाव येथील एका टोळीने खारघरच्या खाडीपात्रात वाळू उपसा सुरू केला आहे. तीन बोटींच्या माध्यमातून प्रशासन पोहचू शकत नाही अशा कांदळवनाच्या बेटांमध्ये मोठे खड्डे करून उपसा केला जात आहे. पनवेलच्या तहसीलदारांनी गेल्या महिन्यात रोडपाली खाडीपात्रात कारवाई केली होती. पनवेल तालुक्यामध्ये करोनामुळे १२४३ जणांचा मृत्यू झाला असून दररोज मृत्यू होणाऱ्यांची संख्या १० पेक्षा अधिक आहे. हा मृत्यूदर कसा कमी करता येईल तसेच तिसऱ्या लाटेसाठी उपाययोजना उभारण्यात प्रशासन गुंतले आहे. याचा फायदा घेत पारगाव येथे खारघर खाडीपात्रात बेकायदा वाळू उपसा होत आहे. तीन बोटी यासाठी वाघिवली येथून दररोज खारघर पात्रात येतात आणि तेथून वाळू उपसा करून ते बोटीनेच पुन्हा वाघिवली येथे घेऊन जातात. यापूर्वी खारघर पात्रातून उपसा केलेल्या वाळूची वाहतूक रोडपाली उड्डाणपुलापर्यंत करणारा रस्ता नुकताच तहसीलदार विजय तळेकर यांनी उद्ध्वस्त केल्याने माफियांनी ही नवी युक्ती लढवली आहे. खारघर ते वाघिवली असा जलवाहतूक केली जात आहे. यापूर्वी खारघर खाडीपात्रात अनेक बाझ सुरू होते. स्थानिक पोलीस, महसूल व तटरक्षक दलाच्या माध्यमांतून या बेकायदा व्यवसायावर कारवाई न झाल्यास खारघर खाडीपात्रासह शहराला पुराचा धोका निर्माण होईल असे स्थानिकांचे म्हणणे आहे. पनवेल तालुक्यात यापूर्वी महसूल विभागाने पुढाकार घेत बेकायदा वाळूउपसा करणाऱ्या १५ बोटींवर कारवाई केली आहे. हजारो ब्रास वाळूसाठा जप्त केला आहे. ही कारवाई सुरूच असते.

**वसई-विरार शहर महानगरपालिका**

**प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम), मुख्य कार्यालय विरार दूरध्वनी क्र. १२२५०-२४०२१७९/२४०२५६३**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरिदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | निळेमोरे-७ | NL३०/३५७/१० | ४१७९ | विनोद राजाराम सागवेकर मिनाक्षी विनोद सागवेकर | दिपेश वासुदेव महाडिक स्वरा दिपेश महाडिक |
| २ | निळेमोरे-७ | NL३०/३४०/२१ | ४१६६ | प्रेमलता उपाध्याय | विष्णु नामदेव शेळके वंदना विष्णु शेळके |
| ३ | निळेमोरे-७ | NL३०/३७७/१०४ | ४१२२ | केरुलाल डि चौरसिय | सुरभी संतोष पांग्रडकर संतोष श्रीधर पांग्रडकर |
| ४ | निळेमोरे-७ | NL३०/१/२९ | ४९८५ | सचीन नानालाल जोशी | जैगम सलिम सऊद अहम चौधरी |
| ५ | निळेमोरे-७ | NL३०/२८०/२ | ४३०४ | खुशी अपाटमेंट | हरीकेश रामफेर यादव शांती हरीकेश यादव |
| ६ | निळेमोरे-७ | NL३०/३४९/५३ | ४५६६ | जिवाभाई निरुबेन परमार | विरम मेपा खुंटी रांभीबेन विरम खुंटी |
| ७ | निळेमोरे-७ | NL३०/४/१७ | ४५८९ | निमाईलाल बॅनर्जी | निखील प्रकाश शिंगरे प्रकाश जगन्नाथ शिंगरे |
| ८ | निळेमोरे-७ | NL३०/२५७/१७ | ४७४५ | भक्ती डेव्हलपर्स | विशाल विलास शिंदे |
| ९ | निळेमोरे-७ | NL३०/३१६/१० | ४०५७ | सुरेश हरिश्चंद्र सागवेकर | सुरेखा सुरेश सागवेकर |
| १० | निळेमोरे-७ | NL३०/३१८/९६ | ४५३६ | शरद विष्णु कांबळे | राजकुमार रामप्रसाद दास |
| ११ | सोपारा-१ | NL३१/१२७/६ | १२४४५ | ओम साई माऊली डेव्हलपर्स | नियाज अहमद नईम खान व जैताब नियाज खान |
| १२ | सोपारा-१ | NL३१/१२७/१० | १२४४६ | मनिष जोशी | रमेश एम राठोड |
| १३ | सोपारा-२ | NL३२/५४२/२१ | १२५३२ | बादशाह अल्ताबक्ष शेख/शाहिर शेख | शरफुद्दीन मोहम्मद उस्मान शेख |
| १४ | निळेमोरे-१ | NL३१/८१/१४ | १२५२० | क्रिश डेव्हलपर्स | सुरज कुमार सत्यनारायण विश्वकर्मा |
| १५ | समेळ-१ | NL०८/२७७/५ | १२४८४ | विजय आर. गिरधर | तुषार दिपक जाधव |
| १६ | समेळ-१ | NL०८/२७७/३७ | १२४८५ | युवराज बी राऊत | समीर संभाजी पालांडे |
| १७ | सोपारा-१ | NL३१/५५/८ | १२४८६ | मोहम्मद हुसेन शेख | अब्दुल सुभान अब्दुल रेहमान बोटके व जाहीद बानो अब्दुल रेहमान बोटके |
| १८ | समेळ-२ | NL०९/५४/७ | १२४८२ | देवानंद झा | भावेश सदानंद मोहीते |
| १९ | निळेमोरे-६ | NL२९/१३२/७ | ७७४१ | जॉयसी नेन्सन परेरा | रूपेश खंडू नाईक |
| २० | निळेमोरे-७ | NL३०/३४४/२५ | १०६२० | अनिल दत्ताराम गावंकर व अंजली अनिल गावकर | कमलेश टक्के व विश्राम काशीराम टक्के |

सही/-

**(धनश्री शिंदे)** सहा. आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.)
वसई-विरार शहर महानगरपालिका

जा. क्र. व.वि.श.म./क.वि/२७६/२०२१-२२
दिनांक : २०/०५/२०२१

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press gala no 3/4, amin Ind. estate, Sonawala Cross Road no 2, Goregaon (East), Mumbai-400063, Maharashtra and Published at Vishnu Sadan society, Ramchandra Sukhai chawl no 1, Room no 4, Jai hind nagar, Khar (East), Dist- Mumbai-400051, Maharashtra. **Editor: Rakesh Shankar Gore**
R.N.I. No. MAHMAR/2010/33301. Off. No.: 022-2651 5151 Mob. 9809386748 / 9803386748, **website:** maharashatracrimetimes.com, **Email:** Info@maharashtracrimetimes.com **Legal Advisor: D. K. Pandey (B.A.L.L.B.) (High Court Mumbai)**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# वाहनचालकांचे उत्पन्न घटले, खर्च वाढला!

**मुंबई (योगेश होळंब):** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे सर्व उद्योगधंदे ठप्प आहेत. यामुळे रस्त्यावरील वाहतूकदेखील घटली आहे. रोजच्या प्रवासासाठी उपयोगात येणाऱ्या टॅक्सी, रिक्षा, बस प्रवासी घटल्यामुळे रस्त्यावर कमी प्रमाणात दिसत आहेत. तसेच विविध उद्योगधंद्यांसाठी उपयोगात येणारे ट्रक, टेम्पो देखील पार्किंगमध्ये धूळ खात उभे आहेत. परिणामी या वाहनांच्या चालकांवर याचा थेट परिणाम झाला आहे. वाहन कामाअभावी पार्किंगमध्येच उभे असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. मागील दीड वर्षापासून उत्पन्नच नसल्याने त्यांना आता हाताला मिळेल ते काम करावे लागत आहे. बँकेत जमा असणारी बचतदेखील संपल्याने आता कुटुंबाचा खर्च तरी कसा चालवावा, हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. उत्पन्न काहीच नसताना कुटुंबासाठी रोज येणारा खर्च त्यांना न परवडणारा झाला आहे. यामुळे आता नेमके करायचे तरी काय, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे.



अत्यावश्यक सेवा वगळता इतर दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन पोलिसांकडून केले जात आहे. यामुळे मुंबईत विविध परिसरांतील गाड्यांच्या स्पेअर पार्टची दुकाने व गॅरेज बंद ठेवली जात आहेत. त्यामुळे वाहने दुरुस्त कशी करायची असा प्रश्न सामान्य नागरिकांसमोर उभा राहिला आहे. ग्राहक दुकानांसमोर येऊन गाड्यांचे स्पेअर पार्ट, इंजिन ऑइल यांची मागणी करतात. मात्र सकाळी दुकान उघडताच पोलीस दुकाने बंद करण्यासाठी येतात. असे दुकानमालकांचे म्हणणे आहे.

अनेक खासगी कार्यालये बंद असल्यामुळे ओला, उबेर, रिक्षा, टॅक्सी यांचा रोजचा व्यवसाय अत्यंत मंदावला आहे. त्याचप्रमाणे रेस्टॉरंट किंवा इतर कारखाने बंद असल्याने कच्च्या मालाचा पुरवठा करणारे ट्रक व टेम्पो चालकांचा व्यवसाय मंदावला आहे. अशातच गाडी बाहेर काढायची म्हटली तरी तिला डागडुजीसाठी गॅरेजमध्ये न्यावे लागते.

# विषाणूपासून बालकांना दूर ठेवण्यासाठी राज्याची तयारी

**मुंबई (राजेश गायकवाड)-** करोनाच्या तिसऱ्या लाटेमध्ये बालकांना अधिक धोका असल्याचा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर आरोग्य यंत्रणांना अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने कठोर पावले उचलली असून करोना कृतिदलातील बालरोगतज्ज्ञ रविवारी, २३ मे रोजी राज्यभरातील डॉक्टरांशी याबाबत चर्चा करणार आहेत.

करोनाबाधित बालकांवरील उपचारासाठी काय तयारी असावी याचे मार्गदर्शन राज्यातील सर्व डॉक्टरांना रविवारी करण्यात येणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या 'माझा डॉक्टर' या संकल्पनेअंतर्गत या वेब-चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. गृहविलगीकरणातील करोनाबाधितांवर उपचार कसे करावेत याचे मार्गदर्शन करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या 'माझा डॉक्टर' संकल्पनेअंतर्गत वेबसंवादाचे आयोजन केले होते. यात करोना कृतिदलाने डॉक्टरांना मार्गदर्शन केले. याला मिळालेला प्रतिसाद पाहून मुख्यमंत्र्यांनी बालकांवरील उपचाराच्या तयारीच्या अनुषंगानेही वेबसंवाद आयोजित करण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार येत्या रविवारी बालरोगतज्ज्ञांकडून राज्यभरातील डॉक्टरांना मार्गदर्शन केले जाणार असून याला मुख्यमंत्रीदेखील उपस्थित असणार आहेत.

'मुंबईतील मोठ्या रुग्णालयां प्रमाणे बालरुग्णां साठीही अशी रचना करता येईल का, डॉक्टरांचे प्रशिक्षण कसे करावे याबाबतही चर्चा करण्यात येईल. कृतिदलातील तीन डॉक्टर मार्गदर्शन करणार असून त्यानंतर डॉक्टरांच्या



प्रश्नोत्तरांचेही निरसन केले जाईल. पूर्वतयारीच्या अनुषंगाने हे नक्कीच फायदेशीर असेल, असे कृतिदलाचे प्रमुख डॉ. सुहास प्रभू यांनी सांगितले.

तिसऱ्या लाटेमध्ये बालकांना धोका असला तरी एकूण रुग्णांपैकी ४ ते ५ टक्के बालकांनाच रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यकता भासू शकते. परंतु हे प्रमाण टक्क्यांमध्ये आहे.

# सायन-पनवेल मार्गावरील विरुद्ध दिशेची वाहतूक ठरते धोकादायक

**मुंबई (विशाल पाटील)-** सायन-पनवेल मार्गावर छगन मिठा पेट्रोल पंप ते सुमननगर येथील विरुद्ध दिशेने होणारी वाहतूक अत्यंत धोकादायक ठरत



आहे. सुमननगरच्या अण्णा भाऊ साठे उड्डाणपुलाखाली मागील दीड वर्षापासून जलवाहिनी दुरुस्तीचे काम सुरू आहे. यामुळे येथे असणारा सर्व्हिस मार्ग पूर्णपणे बंद ठेवण्यात आला आहे. त्या मार्गावरील वाहतूक बंद असल्याने लाल डोंगर, सुमननगर व पूर्व द्रुतगती महामार्गावरून येणाऱ्या वाहनांना नाईलाजाने सायन-पनवेल मार्गावर विरुद्ध दिशेने यावे लागत आहे. या मार्गात पादचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. त्याचप्रमाणे येथे रुग्णालय, पेट्रोलपंप व बसस्थानक असल्याने नागरिकांना या विरुद्ध दिशेच्या वाहतुकीचा त्रास सहन करावा लागत आहे. सायन-पनवेल मार्गावर उमरशी बाप्पा चौक ते सुमननगर दरम्यान वाहनांचा अपघात होण्याच्या घटनाही मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत.

# वांद्रे-कुर्ला संकुलात लवकरच पर्यावरणस्नेही ट्राम?

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** सुकर व जलद वाहतुकीसाठी पुन्हा आधुनिक प्रकारातील ट्राम चालवण्याचा पर्याय पुढे आला आहे. वांद्रे कुर्ला संकुलात वाढत जाणारी कार्यालये आणि अपुरी पडणारी सार्वजनिक वाहतुक पाहता या भागात ट्राम चालवण्यासाठी एमएमआरडीएने (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण)पुढाकार घेतला आहे. यासाठी एमएमआरडीएकडून सल्लागार नियुक्त करण्यात आला असून त्याचा अभ्यास लवकरच सुरु करुन अहवाल सहा महिन्यात मिळणार आहे. ती मेट्रो मार्गिकांनाही जोडण्याचे नियोजन असणार आहे. गेल्या काही वर्षात वांद्रे कुर्ला संकुलात मोठ्या प्रमाणात कार्यालयेही उभी राहिली. त्यामुळे दररोज वांद्रे कुर्ला संकुल व परिसरात येणाऱ्यांची संख्या अधिक असते. कुर्ला स्थानक किंवा वांद्रे पूर्व स्थानकात उतरुन अनेक जण संकुलात कामानिमित्त येतात. त्यामुळे सुकर व जलद वाहतुकीचा पर्याय शोधला जात आहे. या परिसरात स्वयंचलित जलदगती प्रणाली राबवण्याकरीता तांत्रिक व आर्थिक अभ्यास तयार करण्याकरीता नवी दिल्लीतील एका सल्लागाराची नियुक्ती करण्यात आल्याचे एमएमआरडीकडून सांगण्यात आले. त्यांच्याकडून या भागात नवीन व पर्यायी वाहतुकीचा अभ्यास केला जाईल. यात ट्राम किंवा अन्य वाहतुकीचा विचार केला जाऊ शकतो. वांद्रे कुर्ला संकुल आणि संकुलातील मेट्रो स्थानकांना ट्राम जोडतानाच संकुलातील रहिवाशी आणि



इतर व्यावसायिक इमारतींना जोडण्यात येईल. ही प्रणाली पर्यावरणस्नोही,कार्बन विरहित उत्सर्जन असणारी असेल. यामुळे होणारा आवाजही खूपच कमी असणार असल्याचे स्पष्ट केले. या मेट्रोंना नवीन वाहतुक सेवा जोडण्याचा प्रयत्न 'मेट्रो मार्गिका-२ बी-डी.एन.नगर ते मंडाले. 'मेट्रो मार्गिका-३ कुलाबा ते सीप्झ (यात पहिला टप्पा सीप्झ ते वांद्रे कुर्ला संकुल आहे,तर दुसरा टप्पा वांद्रे कुर्ला संकुल ते कुलाबा आहे.

९ मे १८७४ रोजी घोड्याची ट्राम वाहतुक असणारे मुंबईतले पहिले ट्रॅम फाटे सुरु झाले. एक कुलाबा ते क्रॉफर्ड मार्केट मार्गे पायधुणीपर्यंत आणि दुसरा बोरीबंदरपासून काळबादेवी मार्गे पायधुणीपर्यंत. त्यानंतर कुलाबा ते क्रॉफर्ड मार्केट हा विजेचा पहिला ट्रॅमचा फाटा ७ मे १९०७ ला सुरु करण्यात आला.

# एसटीची वसुली झाली तरच कर्मचाऱ्यांना पगार मिळणार

**मुंबई (नितीन देवळेकर)-** आधीच आर्थिक संकटात असलेल्या एसटीला कोरोनाचा फटका बसला आहे. असे असताना काही विभागांकडे एसटी महामंडळाचे देणे बाकी आहे. मात्र, ते वेळेत मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी अडचणी येत आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लोकलसेवा बंद होती. त्यामुळे बेस्टच्या मदतीला एसटी पाठविण्यात आल्या होत्या. त्याचे नियोजन बेस्ट करत होती तर देणी मुंबई महापालिका देत होती. मुंबई महापालिकेने एसटीला ५० कोटींची देणी दिली असून ९० कोटींची देणी थकली आहेत. शासनामार्फत काही घटकांसाठी तिकीट सवलतीच्या योजना राबाविल्या जातात. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी ५० टक्के सवलत, अपंगांसाठी ७५ टक्के सवलत, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ६६ टक्के तिकीट सवलत व विद्यार्थिनींसाठी १०० टक्के मोफत पास सवलत योजना आदी योजना राबविल्या जातात. सवलतीची रक्कम वगळता



उर्वरित रक्क्कम संबंधित लाभार्थीला भरावी लागते. सवलतीची रक्कम शासनाकडून एसटी महामंडळाला दिली जाते. मुंबईत रेल्वे बंद असल्याने अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना सेवा दिली होती. आधीच आर्थिक संकटात असलेल्या कोरोनामुळे २३ मार्च २०२० पासून एसटीची चाके थांबली.त्यामुळे महामंडळाला रोज कोट्यवधी रुपयांचा तोटा झालात्यामुळे एसटी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचे पगार रखडत होते. त्यावर परिवहनमंत्री अनिल परब आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबत चर्चा झाली. आज उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांच्या सोबत बैठक झाली आणि यावर मार्ग काढण्यात आला होता. शासनाकडून एसटीसाठी आर्थिक मदत दिली जात आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य शासनाने मुंबईतील लोकलसह सर्व प्रकारची रेल्वे सेवा बंद ठेवली होती. या पार्श्वभूमीवर मुंबई शहरातील नागरिकांना अत्यावश्यक सेवा देणाऱ्या डॉक्टर, परिचारिका, पोलीस, सफाई कर्मचारी ई. लोकांची वाहतूक करण्याची जबाबदारी शासनाने एसटी महामंडळावर टाकली होती.

# जंगलांचा ऱ्हास करणाऱ्या विकासाला माझा विरोध, मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच विधान

**मुंबई (सम्यक कासारे):** विकास करताना निसर्गरक्षणही कसे साधले जाईल यासाठी सल्ला देणारी संस्था स्थापन करावी आणि हा सल्ला बंधनकारक असेल अशी व्यवस्था निर्माण



करण्याचे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी दिले. जंगलांचा ऱ्हास होणार आहे अशा विकासकामांचे प्रस्ताव आपल्यासमोर येतात तेव्हा त्यांना आपला विरोध असतो, असे ते म्हणाले. आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिनाच्या निमित्ताने वन विभागातर्फे आयोजित वेबिनारमध्ये ते बोलत होते. आपला विकासाला विरोध नाही, तर निसर्गस्नेही विकासाची संकल्पना आपल्याला मान्य आहे. मानव वस्तीवर वन्यजीव कधीही अतिक्रमण करीत नाहीत. माणूस मात्र वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासावर अतिक्रमण करतो. चक्रीवादळ आले की आपण हवामान बदलाचे कारण सांगतो. पण हवामान बदल होण्यास कोणत्या गोष्टी कारणीभूत आहेत याचा आपण विचार करायला हवा. जैववैविधतेबद्दल जनजागृती करावी. जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष डॉ. शेषराव पाटील यांनी जैवविविधता मंडळाच्या कामाची माहिती दिली. पर्यावरण रक्षण आणि संवर्धनातून विकासाची संकल्पना पुढे नेल्यास हा विकास शाश्वत ठरेल आणि मानवास कल्याणकारी ठरेल असेही ते यावेळी म्हणाले. प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर यांनी राज्यात २८ हजारांहून अधिक ग्रामपंचायतींमध्ये जैवविविधता नोंदींचे काम केले जात असल्याचे सांगितले.

# आम्ही नियम पाळतो, मात्र कडक निर्बंध उठवा, व्यापारी संघटनांचे राज्य सरकारला आवाहन

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** राज्यात कोरोना रुग्णांची संख्या कमी होत असल्याने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी १ जूनपासून कोरोना रोखण्याचे केलेले कडक निर्बंध उठवून बाजारपेठा उघडण्याची अनुमती द्यावी, सरकारने ठरवून दिलेल्या नियमावलीचे व्यापारी काटेकोर पालन करतील, अशी हमी राज्यातील प्रमुख व्यापारी संघटनांनी दिली आहे.



कॉन्फडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतीया यांनी 'लोकमत'ला सांगितले की, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठा खुल्या करताना कोणती नियमावली असावी, याचा प्रस्ताव आम्ही सरकारला देऊ. सरकारने चर्चेची तयारी दर्शविली तर दोघांच्या समन्वयातून अंतिम नियमावली ठरविता येईल. व्यापाराला कोट्यवधी रुपयांचा फटका बसला आहे. आता राज्य शासनाने निर्बंध आणखी वाढवू नयेत. निर्बंध वाढवण्याचा निर्णय घेतल्यास यामुळे अनेकांचे अगणित हाल होतील असे त्यांचे मत आहे. चेम्बर ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्री अँण्ड ट्रेडचे (कॅमिट) अध्यक्ष मोहन गुरुनानी म्हणाले की, व्यापाराचे गेल्या सव्वा वर्षात कंबरडे मोडले आहे. आता कडक निर्बंध वाढविले तर व्यापारी अक्षरश: कोलमडून पडतील. व्यावसायिक प्रतिष्ठाने सरसकट सुरू करा, भलेही वेळेची मर्यादा घाला. सरकारने ठरवून दिलेले नियम पाळण्याची आमची तयारी आहे. मालवाहू गाड्या बाजारपेठेत येतील तेव्हा बाजारपेठ सुरू ठेवायची की नाही, हे ठरवावे. जेथे घाऊक आणि किरकोळ व्यापार एकत्रित चालतो तेथे दोन्हींच्या वेगवेगळ्या वेळा ठरविता येतील. थुंकणाऱ्यास दंड करावा, विनामास्क कोणीही दिसता कामा नये. बाजारपेठेत स्वच्छतेची जबाबदारी व्यापारी संघटनेची असेल. ग्राहकांच्या थेट संपर्कात येणारे व्यापारी व नोकर हे मास्क आणि फेसशिल्ड घालतील. दुकानात एकावेळी किती लोक असतील ते क्षेत्रफळानुसार ठरवावे. दुकानात किती माल असावा, याची मर्यादा ठरवून द्यावी.

# ना मामाचा गाव, ना खेळाचा डाव, मुलांचे मानसिक आरोग्य जपण्याचे आव्हान

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** उन्हाळ्याची सुट्टी म्हटलं की, मुलांची सगळ्यात आधी तयारी असते ती मामाच्या गावाला जायची! परंतु मागच्या वर्षीप्रमाणे यंदाही लॉकडाऊनमुळे मुलांना या धमाल मस्तीला मुकावे लागले आहे. या सगळ्यांमुळे घरात अडकून असलेल्या मुलांमध्ये वाढणारी चिडचिड, त्यांचा कॉम्प्युटर, मोबाईलवरील वाढता स्क्रीनटाईम आणि या सगळ्याचे त्यांच्या मानसिक आरोग्यावर होणारे विपरीत परिणाम यावर पालकांनाही नियंत्रण राखणे अवघड होऊन बसले आहे. अनेक पालक तर यासाठी समुपदेशकांची, मानसिक आरोग्यतज्ज्ञांची मदत घेऊ लागले आहेत. त्यामुळे हा कोरोनाचा लॉकडाऊन काळ म्हणजे ना मामाचा गाव, ना खेळाचा डाव, मुलांसाठी मात्र रडीचा डाव बनल्याच्या प्रतिक्रिया पालक आणि समुपदेशकांमधून व्यक्त होत आहेत. मागील दीड वर्षापासून शाळेच्या स्वतंत्र भावविश्वात वाढणाऱ्या मुलांना सक्तीने घरात ऑनलाईन शिक्षण घ्यावे लागले आहे. बाहेर जाऊन मैदानी खेळही खेळता येत नसल्याने, मित्र-मैत्रिणी, अभ्यास, खेळ, शिक्षकांशी असलेले भावनिक नाते हरवले आहे. यामुळे मुलांच्या भावविश्वावर आघात झाल्याने पालकांना



मुलांचे मनोधैर्य वाढविण्यास तारेवरची कसरत करावी लागत असल्याच्या प्रतिक्रिया पालक स्वतः देत आहेत.

मुलांच्या विकासात मानसिक आरोग्याला सर्वाधिक महत्त्व आहे. मुलांमधील भावनिक वर्तणूक व मनोसामाजिक समस्यांचे योग्यवेळी शास्त्रीय निराकरण न झाल्यास त्यांच्या मानसिकतेसह शिक्षण, आरोग्य आणि समाज वर्तनावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता मानसोपचार तज्ज्ञांनीही वर्तविली आहे. मुलांच्या शारीरिक आरोग्यासोबत त्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेणे ही या काळातील महत्त्वाची जबाबदारी असून त्याचा मोठा भार पालकांवर आहे. त्यांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी मानसिकरीत्या तयार करणे हाही त्याचाच भाग आहे. दरम्यान, पालकांनी त्यांच्या आहाराकडे पूर्ण लक्ष देऊन, आपल्या कामातून योग्य वेळ मुलांना दिला तर त्यांची मानसिक, शारीरिक वाढ योग्य होईल, असे मत शिक्षक समुपदेशक असलेल्या श्रीकांत शिनगारे यांनी मांडले. छोट्या शाळकरी मुलांना कोरोनामुळे वर्षभर घराबाहेर जाता न येण्याने अनेक भावनिक परंतु अव्यक्त समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या काळात मुलांच्या आहार, विहार, विचार व उपचार या चार घटकांची काळजी अत्यावश्यक आहे. त्यामुळे त्यांचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य चांगले राहू शकेल.

# देवेंद्र फडणवीस यांनी मोदींकडे पॅकेजसाठी आग्रह धरावा, नवाब मलिक यांचा सल्ला

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** कोकणातील जनतेला भरपाई देणार आहोतच, परंतु महाराष्ट्राला जास्तीत जास्त मदत मिळवून



देण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी मोदींकडे आग्रह धरला पाहिजे. त्यांनी तसे केले तर ते राज्यातील जनतेसोबत आहेत हे सिद्ध होईल. मात्र देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रासोबत नाहीत हे आता सिद्ध होऊ लागले आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांनी केली आहे. विरोधीपक्ष वैफल्यग्रस्त मानसिकतेतून टीका करत आहेत, हे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. राज्य सरकारची यंत्रणा, प्रशासन अंदाज घेत आहे. पंचनामे करत आहे. पालकमंत्री सातत्याने संपर्कात आहेत. मुख्यमंत्र्यांनी काही भागांचा दौरा केल्यानंतर त्याचा अंदाज पंचनाम्याच्या माध्यमातून येईल. त्यानंतर निश्चित रूपाने एनडीआरएफ, एसडीआरएफच्या स्टॅंडिंग ऑर्डरपेक्षा त्याव्यतिरिक्त अतिरिक्त मदत देण्याची राज्य सरकारची भूमिका असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारकडून जास्तीत जास्त मदत मिळण्यासाठी आग्रह धरला पाहिजे, ही त्यांची जबाबदारी आहे. मात्र आग्रह धरत नाहीत आणि राज्य सरकार काय देणार यावर ते बोलत आहेत, असा टोलाही मलिक यांनी लगावला.

# मच्छीमार बांधवांचा आक्रोश समजून मदत करा; आमदार आशिष शेलार यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**मुंबई (विशाल पाटील)-** तौक्ते वादळाने नुकसान झालेल्या मच्छीमार बांधवांचा आक्रोश सरकारने समजून घेऊन सध्याच्या जीआरमध्ये बदल करावा आणि मच्छिमार बांधवांना मदत करावी, असे मत भाजप नेते व आमदार ॲड. आशिष शेलार यांनी नुकतेच व्यक्त केले. मुख्यमंत्र्यांनी भेटीसाठी वेळ देऊन या मच्छीमारांचा आक्रोश समजून घेणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले.



ससून डॉक, मढ, खार दांडा, माहिम येथे प्रचंड नुकसान झाले आहे, तर वरळीत कोव्हलँन्ड जेटीवर अद्याप पंचनामेच झाले नाहीत, अशी माहिती त्यांनी लोकमतला दिली. तौक्ते चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या किनारपट्टीचा आमदार अँड आशिष शेलार आणि भाजप आमदार मनीषा चौधरी यांनी दोन दिवसाचा दौरा केला. पहिल्या दिवशी वसई डहाणू, सातपाटी या पालघरमधील परिसराची पाहणी केली. तर काल त्यांनी ससून डॉक, वरळी, माहीम, वर्सोवा, मढ या मुंबईच्या मच्छिमार बंदरांना भेटी देऊन मच्छीमार बांधवांच्या नुकसानीची पाहणी करून मच्छिमार बांधवांशी संवाद साधला. ससून डॉक येथील सुमारे ५५ बोटींचे नुकसान झाले असून मासेमारीचे साहित्य, जाळी यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे सध्याच्या जीआरनुसार, आम्हाला मदत मिळू शकत नाही. कृपया सरकारने आमचे नुकसान समजून घेऊन मदत करावी, अशी विनंती येथील ससून डॉक फिशरमेन असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी केली. त्यानंतर वरळी येथील कोव्हलँन्ड जेटीला आमदार अँड आशिष शेलार यांनी भेट दिली असता येथे दोन बोटींचे प्रचंड नुकसान झाले असून जेटीही फुटली आहे. मात्र अद्याप या ठिकाणी पंचनामे झालेले नाहीत. त्यामुळे आमच्या नुकसानीचे पंचनामे करा, अशी विनंती कोळी बांधव करीत होते. माहीम रेतीबंदर कोळीवाडा गावठाण रहिवासी संघ, येथे आमदार आशिष शेलार यांनी भेट देऊन मच्छिमार बांधवांशी संवाद साधला तेव्हा त्यांच्या अश्रूंचा बांध फुटला.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, यांचे कार्यालय**
☎ २२०१६९७४
२२०१६९७६
Email : integratedmumbai.ee@mahapwd.com
**ई-निविदा सूचना क्र. १० सन २०२१-२२**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, फोर्ट, मुंबई-०१ (दूरध्वनी क्रमांक- २२०१६१७४ /७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य वर्गातील अंतर्गत सजावट नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, फोर्ट, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | सेंट जॉर्जेस रुग्णालय, मुंबई येथील आवारातील शवगृहाचे श्रेणीवर्धन अंतर्गत इमारतीचे बांधकाम करणे. | १,४३,३५,९१२/- |

(एकूण ०१ कामे)

ई-निविदा उपलब्ध : दि. १७/०५/२०२१ सकाळी १०.३० पासून ते दि. २४/०५/२०२१ पर्यंत रोजी १४.०० पर्यंत कालावधी

ई-निविदा उघडणे : दि. २५/०५/२०२१ रोजी १५.०५ वाजता

(शक्य झाल्यास)

खालील संकेतस्थलावरून ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1) http://mahapwd.com 2) http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत सल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल)
३. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बा.) विभाग, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक

जा. क्र.एघ (सा.बां.)/निविदा/११३८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग
२५ मर्झबन पथ, फोटो, मुंबई- ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०१६९७४/७६
दिनांक : ११/०५/२०२१

कार्यकारी अभियंता
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग
मुंबई- ४०० ००१

**डीजीआयपीआर/२०२१-२०२२/५०३**

# एमएमआरडीएमार्फत मुंबई उपनगरामध्ये सुरु असलेल्या विविध कामांची पालकमंत्री आदित्य ठाकरे यांनी केली पाहणी

**मुंबई (सम्यक कासारे)-** एमएमआरडीए मार्फत मुंबई उपनगरामध्ये सुरु असलेल्या विविध कामांची आज पालकमंत्री आदित्य ठाकरे यांनी पाहणी केली. मालाड (पश्चिम) येथे एमएमआरडीएमार्फत उभारण्यात येत असलेल्या समर्पित कोव्हिड-१९ हॉस्पिटलच्या कामाची पाहणी करण्यात आली. कोरोना रुग्णांसाठी मुंबईत पुरेशा उपचार सुविधांची उपलब्धता करणे तसेच कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या तयारीच्या अनुषंगाने हे सुसज्ज समर्पित कोविड १९ हॉस्पिटल उभारण्यात येत आहे, असे पालकमंत्री श्री. ठाकरे यांनी सांगितले. वस्त्रोद्योग आणि मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त आर. ए. राजीव यावेळी उपस्थित होते.

यानंतर पालकमंत्री श्री. ठाकरे यांनी मालाड पूर्व येथील भुस्खलन झालेल्या जागेला भेट दिली. मागील वर्षी भुस्खलन झालेल्या या जागेवर यंदा एमएमआरडीएमार्फत आयआयटीच्या सहयोगातून भूस्खलन रोखण्यासाठी काम करण्यात येत आहे. या कामाची पाहणी करण्यात आली. येत्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर हे काम जलदगतीने करण्यात येत आहे. यानंतर पालकमंत्री श्री. ठाकरे यांनी एमएमआरडीएमार्फत काम सुरु असलेल्या कलानगर उड्डाणपूलाच्या मार्गिकेची पाहणी केली. या मार्गिकेचे बांधकाम लवकरच पूर्ण होईल, जेणेकरून कलानगर जंक्शन येथील वाहतुकीच्या कोंडीचा प्रश्न सुटेल. शहरात एमएमआरडीएमार्फत हाती घेण्यात आलेली ही विविध कामे गुणवत्तापूर्ण करण्यात यावीत. तसेच पावसाळ्यात लोकांची सोय होण्याच्या दृष्टीने कामे जलदगतीने करण्यात यावीत, अशा सूचना पालकमंत्री श्री. ठाकरे यांनी यावेळी एमएमआरडीए अधिकाऱ्यांना दिल्या. एमएमआरडीए महानगर आयुक्त आर. ए. राजीव, अतिरिक्त महानगर आयुक्त डॉ. के. एच. गोविंदराज, सहआयुक्त बी.जी. पवार आदी वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.



# ब्लाउजने गळा आवळून सासूचा खून, मुलाने आणि सुनेनं मृतदेह पोत्यात भरून झुडपात फेकला!

**मावळ (विशाल कारंडे)- सासू-सुनेच्या होणाऱ्या किरकोळ वादातून संताप अनावर झाल्याने २२ वर्षीय सुनेने आपल्या पतीच्या मदतीने ४५ वर्षीय सासूचा ब्लाउजने गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना पुणे जिल्ह्यातील तळेगाव शहरातील टेल्को हाऊसिंग सोसायटीत घडली आहे. या घटनेप्रकरणी सून पूजा शिंदे तसेच तिचा पती मिलिंद शिंदे या दोघांना तळेगाव पोलिसांनी अटक केली आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी पूजा आणि तिची मयत सासू बेबी शिंदे या दोघींमध्ये कडाक्याचे भांडण झाले त्यानंतर राग अनावर झाल्याने पूजाने घरातील कापडी ब्लाउजच्या साहृयाने सासू बेबी हिचा गळा आवळला. तसंच ती निपचित पडल्यावर संबंधित घटना आपला पती मिलिंद यास सांगितली दोघांनी संगणमत करून मृत्यूमुखी पडलेल्या बेबी शिंदे हिचा मृतदेह एका प्लास्टिकच्या पोत्यात भरला आणि कोणालाही संशय येऊ नये म्हणून मृतदेह घराच्या छतावर एका कोपऱ्यात ठेवला. दोन दिवसानंतर मृतदेह कुजू लागल्याने तसंच त्याची दुर्गंधी इतरत्र पसरू लागल्याने आपण केलेला गुन्हा उघडकीस येईल या भीतीपोटी दोघांनी मृतदेह उचलून जवळच असलेल्या एका निर्जन ठिकाणी झाडा झुडपात फेकून दिला. परंतु पोत्या मधून येणाऱ्या दुर्गंधीने टेल्को कॉलनी येथील रहिवाशांचा संशय बळावला, त्यांनी तात्काळ ही घटना तळेगाव पोलिसांना कळविली.



पोलिसांनी घटनास्थळावर दाखल होत शहानिशा केली असता पोत्यामध्ये महिलेचा मृतदेह आढळून आला संबंधित मृतदेहाची ओळख पटवल्यानंतर चौकशीसाठी मयत महिलेची सून पूजा शिंदे हिला ताब्यात घेतले. सुरुवातील तिने उडवाउडवीची उत्तर दिली, पण सासूच्या भांडणाला आणि त्रासाला कंटाळून तिने गळा आवळून खून केल्याची कबुली पोलिसांना दिली. या संपूर्ण प्रकरणात पती मिलिंद याचा ही सहभाग असल्याचे पूजाने पोलिसांना सांगितले. संबंधित खुना प्रकरणी मयत महिलेचा धाकटा मुलगा अमित शिंदे याने तळेगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. जन्मदात्या आईच्या खुनात मोठया मुलाचा सहभाग असल्याने शहरात खुनाच्या घटनेप्रकरणी नागरीकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहे.

# दादर मार्केटमध्ये टॅक्सीचालकाची हत्या; भाडे नाकारताच...

**मुंबई (नितीन देवळेकर):** भाडे नाकारले म्हणून संतापलेल्या फळविक्रेत्याने डोक्यात पेव्हर ब्लॉक टाकून टॅक्सीचालकाची हत्या केल्याची घटना आज दादरच्या गजबजलेल्या परिसरात घडली. छबीलाल जैस्वार (५५) असे मृत टॅक्सीचालकाचे नाव असून दादर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज वरून काही तासांतच आरोपी बसवराज मेलिणामनी (३०) याला अटक केली आहे. या घटनेने दादरमध्ये एकच खळबळ उडाली आहे. दादर मार्केटमधील कबुतरखाना येथे सकाळी ६ वाजताच्या सुमारास छबीलाल जैस्वार हा टॅक्सी घेऊन आला होता. यादरम्यान बसवराज त्या ठिकाणी आला आणि त्याने छबीलाल याला जवळच जायचे आहे असे सांगितले. मात्र, जवळचे भाडे असल्याने छबीलाल याने नकार दिला. याच परिसरात राहत असल्याने आणि फळविक्री करीत असल्याने बसवराज दादागिरी करू लागला. यावरून



दोघांमध्ये जोरदार बाचाबाची झाली. यामुळे संतापलेल्या बसवराज याने जवळच असलेला सिमेंटचा पेव्हर ब्लॉक उचलला आणि छबीलाल याच्या डोक्यात मारला. त्यात डोक्याला गंभीर इजा झाल्याने छबीलाल याचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच दादर पोलीस घटनास्थळी पोहचले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक मृत्यूंजय हिरेमठ यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक महेश थिटे यांच्यासह रावराणे, संतोष पाटणे, अजित महाडीक, महेश कोलते यांच्या पथकाने प्रत्यक्षदर्शीनी दिलेली माहीती आणि सीसीटीव्ही फुटेजवरून बसवराज याला शोधून काढले. घटनास्थळावरून पसार झालेल्या बसवराज याला काही तासांतच पोलिसांनी बेड्या ठोकल्या. दरम्यान, जवळचे भाडे नाकारण्यावरून टॅक्सीचालक आणि प्रवाशांची भांडणं काही नवीन नाहीत. त्याबाबत पोलिसांकडून अनेकदा कारवाईची पावलेही उचलण्यात आलेली आहेत.

# बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यासाठी सोडली नोकरी; पतीसोबत सुरू केली समाजसेवा

**भुवनेश्वर (जसबीरकौर भामरा)-** कोरोनानं देशासह जगभरात थैमान घातलं आहे. कोरोना सतत आपलं रूप बदलत असल्यानं चिंता आणखीच वाढली आहे. यामुळे मृतांचा आकडाही झपाट्यानं वाढत आहे. या काळात असंही अनेकदा होत आहे, की मृतांचे अंत्यसंस्कार करण्यासाठी त्यांचे कुटुंबीय समोर येत नाहीत. अशाच बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कार करत समाजसेवा करण्यासाठीही अनेक लोक पुढे सरसावले आहेत. यात ओडिसातील एक जोडपंही आहे. एएनआयनं दिलेल्या वृत्तानुसार, मधुस्मिता प्रुस्ति कोलकाताच्या एका बड्या रुग्णालयात नर्स म्हणून काम करत होत्या. तर, त्यांचे पती भुवनेश्वरमध्ये बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कार करायचे. यात कोरोना रुग्णांचे मृतदेहही असतात. याचदरम्यान



मधुस्मितादेखील आपली नोकरी सोडून भुवनेश्वरमध्ये आल्या आणि या भल्या कामाता त्यांनी आपल्या पतीला हातभार लावण्यास सुरुवात केली. मधुस्मिता यांनी सांगितलं, की त्यांनी ९ वर्ष नर्सचं काम केलं आहे. मात्र, २०१९ मध्ये त्या भुवनेश्वरमध्ये परत आल्या आणि आपल्या पतीला त्याच्या कामात साथ देऊ लागल्या. आता दोघंही बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कार करतात. त्यांच्या म्हणण्यानुसार, मागील अडीच वर्षात त्यांनी जवळपास ५०० मृतदेहांवर अंत्यसंस्कार केले आहेत. यात मागील वर्षी भुवनेश्वरमध्ये झालेल्या ३०० कोरोना रुग्णांच्या मृतदेहाचाही समावेश आहे. त्यांनी सांगितलं, की एक महिला असून हे काम करत असल्यानं अनेकजण माझी निंदा करतात आणि माझ्यावर टीकाही करतात. मात्र, माझा पती चालवत असलेल्या ट्रस्टच्या अंतर्गत मी हे काम करत आहे.

# पुण्यात वातावरण बदलले, वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता

**पुणे (अभिजीत येरल्लु)-** तौक्ते चक्रीवादळामुळे राज्यात उन्हाळयात पावसाळयाची अनुभूती आली. जून महिन्यात आता मान्सूनचे आगमन होणार आहे. त्यामुळे वातावरणात आतापासूनच बदल जाणवू लागले आहे. पुण्यात संध्याकाळच्या सुमारास हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. तसंच बुधवारपासून वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा दिला आहे. भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) ने पुण्यात या आठवड्यात पावसाचा अंदाज वर्तवला आहे. बुधवारपासून वादळी वारे आणि शनिवारपासून विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवली आहे. पुण्यात रविवारी अनेक भागात पावसाने हजेरी लावली. शिवाजीनगर व लोहेगाव येथे अनुक्रमे ०.१ मिमी व १ मिमी मिमी पावसाची नोंद



झाली. 'विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, कोकण आणि गोवा या चार विभागांची हवामान स्थिती प्रामुख्याने पूर्व उत्तर प्रदेश आणि कर्नाटक रेषेद्वारे चालविली जाते. सध्या पुणे शहरात मंगळवारपर्यंत संध्याकाळच्या सुमारास मुसळधार पाऊस पडेल.' अशी माहिती पुणे आयएमडीच्या हवामान अंदाज विभागाचे प्रमुख अनुपम कश्यपी यांनी दिली. आठवडाभर शहरातील कमाल तापमान ३६ डिग्री सेल्सियस ते °३८ डिग्री सेल्सियस पर्यंत राहील, अशी माहिती हवामान खात्याच्या अधिकाऱ्यांनी दिली. रविवारी शिवाजीनगर येथे कमाल तापमान ३५.३ डिग्री सेल्सियस नोंदले गेले. लोहेगाव वेधशाळेत रविवारी कमाल तापमान ३७.२ डिग्री सेल्सियस इतके नोंदले गेले जे सामान्य तापमानात ०.२ अंश सेल्सिअस होते. पुढील आठवड्यांमध्ये २७ मे ते २ जून दरम्यान केरळमध्ये पाऊस पडण्याची शक्यता आहे. मान्सूनचा मार्ग सकारात्मक आहे.

# पैलवान सुशिल कुमारने अशी केली सागर धनखडची हत्या अन् असा देत होता पोलिसांना चकवा

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)-** जागतिक कुस्ती दिनादिवशीच आंतरराष्ट्रीय पातळीवर नावारुपाला आलेच्या सुशिल कुमारच्या हातात पोलिसांनी ठोकल्या बेड्या. पैलवान सागर धनखड हत्याकांड प्रकरणात फरार सुशिल कुमार फरार होता. पोलिसांकडून त्याची कसून चौकशी करण्यात येत आहे. ऑलिम्पिक विजेता ठरलेला सुशिल कुमार हत्याकांडच्या प्रकरणात मुख्य आरोपी कसा झाला? त्याने सागरची हत्या का केली? हे सर्व प्रकरण नेमकं काय आहे? याची उत्तरं जाणून घेऊ. सागर धनखड ज्या फ्लॅटमध्ये राहत होता, तो फ्लॅट सुशिल कुमारच्या पत्नीच्या नावावर आहे. ब्रोकरच्या माध्यमातून सागरने हा फ्लॅट भाड्याने राहण्यासाठी



घेतला होता. पोलिस सूत्रांकडून सांगितलेल्या माहितीनुसार फ्लॅटच्या भाड्यावरून ही हत्या करण्यात आली आहे. सागर धनखड हा ज्युनिअर नॅशनल पैलवान आहे. त्या फ्लॅटमध्ये सागरशिवाय इतरही सहकारी राहत होते. दरम्यान, सुशिल कुमारला कळले की, त्याच्या फ्लॅटवर फरार असणारा कुख्यात गुंड काला झटेडी आणि त्याची गँग लपण्यासाठी येत असत. सुशिल कुमारने ब्रोकरच्या माध्यमातून सागर धनखडला फ्लॅट रिकामा करण्यासाठी सांगितले. सुरुवातीला सागरने फ्लॅट सोडण्यासाठी टाळाटाळ केली. परंतु, नंतर त्याने फ्लॅट रिकामा केला. पण, एक महिन्याचे भाडे न देताच तो आपल्यासोबत फ्लॅट रिकामा करून गेला. सुशिल कुमारेन ब्रोकरच्या माध्यमातून दोन महिन्याचे भाडे मागितले. पण, तो टाळाटाळ करत होता. शेवटी सुशिल कुमार आपल्या सहकाऱ्यांची मदत घेऊन सागर आणि त्याच्या ३ मित्रांचे अरहरण केले. त्या सर्वांना छत्रसाल स्टेडियममध्ये आणण्यात आले आणि सर्वांना बेदम मारहाण केली. मार खाणाऱ्यामध्ये सागरचा दोस्त सोनू महालदेखील होता. तो काला झटेडीच्या गँगमधील एक होता. त्यावर अनेक गुन्हे नोंद आहेत. या मारहाणीत सागरच्या डोक्याला गंभीर मार लागला. शेवटी सागरने रुग्णालयात प्राण सोडला.

# जिल्ह्यात म्युकरमायकोसिसचा पहिला बळी

**चिपळूण (राकेश साळवी):** गेले २५ दिवस कामथे उपजिल्हा रुग्णालयात मृत्यूशी झुंज देणाऱ्या तालुक्यातील नायशी येथील ३५ वर्षीय कोरोनाबाधित व म्युकरमायकोसिसचा आजार जडलेल्या रुग्णांचा शुक्रवारी रात्री मृत्यू झाला. जिल्ह्यातील म्युकरमायकोसिसचा पहिला बळी ठरला आहे.काही दिवसांपूर्वी त्यांना कोरोनाची बाधा झाल्याने उपचारासाठी कामथे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अशातच त्यांना म्युकरमायकोसिसचा त्रास झाला. त्यामुळे त्यांची तपासणी करण्यात आली. यामध्ये त्यांचा अहवाल पॉझिटिव्ह आला. अशातच शुक्रवारी रात्री उपचार सुरु असतानाच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्यावर शनिवारी नायशी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.ते खासगी संस्थेत चालक म्हणून काम करीत होते. गेली १५ वर्षे या संस्थेत कार्यरत होते. चार वर्षांपूर्वी त्यांचा विवाह झाला होता. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन वर्षीय मुलगा, आई-वडील, दोन भाऊ असा परिवार आहे.

# बैलगाडा शर्यतींचे अड्डे अंबरनाथमध्ये सुरूच: पोलीसांची बघ्याची भूमिका

**नेवाळी (ठाणे) (तृप्ती गोरे)-** अंबरनाथ तालुक्याच्या ग्रामीण भागात गेल्या महिनाभरात बंदी असलेल्या बैलगाडी शर्यतींचा धुरळा पुन्हा उडण्यास सुरुवात झाली आहे. काकडवाल येथील बैलगाडी शर्यतीचा प्रकार ताजा असतानाच, तालुक्यातील उसाटने गावाच्या शिवारातील माळरानावर रविवारी पुन्हा बैलगाडीच्या शर्यतीचा धुरळा उडाल्याचा प्रकार समोर आला.

एकीकडे ग्रामीण भागात कोरोनाने हाहाकार माजवला असताना उसाटने गावच्या शिवारात मात्र सर्रास बैलगाडा शर्यती आयोजित केल्या जात आहेत. अंबरनाथ तालुक्यातील मलंगगड भागात मागील काही दिवसांमध्ये कोरोनाचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत.

मात्र असं असतानाही उल्हासनगरच्या हिललाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीत सर्रास पाने बैलगाडा शर्यती



आयोजित केल्या जात असल्याचं अनेक वेळा समोर आलं आहे. या आधी देखील काकडवाल गावात शर्यती आयोजित झाल्या होत्या त्या नंतर आता रविवारी पुन्हा एकदा उसाटने गावच्या शिवारात बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले गेले होते.

एकीकडे कोरोनामुळे नागरिकांना घराबाहेर न पाडण्याचे आवाहन पोलीस करत असताना दुरीकडे मात्र बैलगाडा शर्यती आयोजकांना दुसरे आवाहन करत असल्याचे दिसून येत आहे. लाखो रुपयांची उधळपट्टी बैलगाडा शर्यतींमध्ये होत असल्याने सध्या पोलीस देखील दुर्लक्ष करत आहेत. पोलिसांचं हे दुर्लक्ष ग्रामीण जनतेच्या जीवावर उठण्याची चिन्हे आहेत.

सुप्रीम कोर्टाने बैलगाडा शर्यतींवर बंदी घातली असताना उल्हासनगर परिमंडळ-४ मध्ये असलेल्या हिललाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीत बैलगाडा शर्यती आयोजित झाल्याच कशा? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. मात्र राजकीय दबावांपोटी या शर्यतींकडे दुर्लक्ष केले जात आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. गावामध्ये होणाऱ्या हालचालींची पोलीस यंत्रणांना माहिती मिळावी यांसाठी पोलीस यंत्रणांच्या नियुक्त्या केल्या जात असतात.

# उद्ध्वस्त कोकणातील शेतकऱ्यास बांधावर जाऊन तातडीने मदत करा!; भाजपा प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी यांचे राज्य सरकारला साकडे

**मुंबई (राजेश गायकवाड)-** लागोपाठ दुसऱ्या वर्षी ऐन हंगामात आलेल्या भीषण चक्रीवादळामुळे कोकण किनारपट्टी आणि लगतच्या जिल्ह्यांतील आंबा बागायतदारांचे कंबरडे पुरते मोडले असून केवळ कागदावरचे आदेश आणि घोषणा न करता आंबा बागायतदार व गरीब शेतकऱ्याच्या मदतीसाठी प्रत्यक्ष पॅकेज मिळाले पाहिजे, अशी मागणी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे राज्य सरकारकडे केली आहे. कोकणातील हापूस, कोकम, नारळीपोफळी आणि मच्छीमारी हे उत्पन्नाचे सर्व मार्ग तौते चक्रीवादळाने धुवून टाकले असून कोकणी अर्थव्यवस्थेस यापूर्वी कधीही नव्हता एवढा जबर फटका बसला आहे. कोकणाबरोबरच पश्चिम महाराष्ट्रातही आंबा पिकाचे मोठे नुकसान झाले असून राज्य सरकारने तातडीने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्याना मदत देण्याची व्यवस्था करावी अशी मागणीही भांडारी यांनी केली आहे. गेल्या वर्षी जूनमध्ये आलेल्या निसर्ग चक्रीवादळाने कोकणातील शेतकरी पुरता उद्ध्वस्त झाला होता. राज्य सरकारने तेव्हा जाहीर केलेल्या मदतीपासून अजूनही असंख्य शेतकरी वंचितच असताना यंदा तौते वादळाने नवा जबर फटका दिल्याने आंबा उत्पादक, मच्छीमार आणि शेतकऱ्यास सावरणे अशक्य



झाले आहे. उद्ध्वस्त कोकणास पुन्हा उभे करण्यासाठी केवळ कागदी आदेश आणि घोषणा पुरेशा नसून आता त्याला थेट मदत मिळाली पाहिजे, व राज्य सरकारने आढावा घेण्यात वेळकाढूपणा न करता तातडीने मदतीचे वाटप करून शेतकऱ्यास दिलासा दिला पाहिजे, असे भांडारी यांनी या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. तौते वादळामुळे झालेल्या हानीमुळे किमान पाच वर्षे शेतकऱ्यास डोके वर काढता येणार नाही. मच्छीमार कुटुंबांनाही मोठे नुकसान सोसावे लागले आहे. किनारी भागातील असंख्य घरेदारे, गोठे उद्ध्वस्त झाले आहेत, तर मच्छीमारांच्या उपजीविकेचे साधन असलेल्या नौकाची हानी झाली आहे. आंबा-कोकम-काजू, नारळ-पोफळी आणि मच्छीमारी तसेच पर्यटन व्यवसायावर जगणाऱ्या कोकणी माणसासाठी राज्य सरकारकडे कसलेही धोरण नाही, उद्योगांना मदत करण्याची कोणतीही योजना नाही आणि कोकणच्या नियोजनबद्ध विकासाचे कोणतेही मॉडेल सरकारने आखलेले नाही. राज्याच्या अन्य भागांतील नगदी पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांप्रमाणेच, कोणताही भेदभाव न करता कोकणासाठीही राज्य सरकारने मदतीचा हात दिला पाहिजे, असे ते म्हणाले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यास कर्जावरील व्याजमाफी, वीजबिल माफी आणि कर्जफेडीस मुदतवाढ मिळाली पाहिजे,अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# खताच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांना अनुदान द्या; भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचे केंद्र सरकारला पत्र!

**मुंबई (वृत्तसंस्था)-** खत उत्पादक कंपन्यांनी गेल्या काही दिवसात खताच्या किंमतीत वाढ केली असून त्यामुळे पडणारा बोजा ध्यानात घेऊन शेतकऱ्यांना खताच्या खरेदीसाठी अनुदान द्यावे, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्रसिंह तोमर आणि केंद्रीय खते व रसायने मंत्री सदानंद गौडा यांच्याकडे पत्राद्वारे केली.

चंद्रकांत पाटील यांनी या मंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे की, गेले वर्षभर कोरोना महासाथ आणि अन्य नैसर्गिक संकटांमुळे शेतकरी संकटात सापडले आहेत. अशातच खत उत्पादक कंपन्यांनी खताची किंमत वाढविल्यास शेतकऱ्यांसाठी अधिकच नुकसानकारक



ठरेल. मान्सून काही दिवसांवर आला असून शेतकऱ्यांनी खरीपाच्या पेरणीसाठी तयारी सुरू केली आहे. हे ध्यानात घेता केंद्र सरकारने शेतकऱ्यांना खताच्या खरेदीसाठी लवकरात लवकर अनुदान घोषित करावे.

ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार हे शेतकऱ्यांच्या हिताचे काम करत आहे. मोदी सरकारने शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अनेक प्रभावी निर्णय घेतले आहेत व योजना सुरू केल्या आहेत. चंद्रकांत पाटील यांनी या संदर्भात भाजपाचे किसान मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजकुमार चहर यांनाही पत्र पाठविले असून केंद्र सरकारने शेतकऱ्यांना खत खरेदीसाठी अनुदान जाहीर करण्यासाठी सरकारकडे पाठपुरावा करण्याची विनंती केली आहे.